**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स अदानी सिमेंटेशन लिमिटेड यांच्या मौजे शहाबाज व शहापूर, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र येथील अंबा नदीवरील प्रस्तावित प्रकल्प बर्थिंग जेट्टी, अतिरिक्त साठवणूक सुविधांसह कन्वेअर कॉरिडॉर व पोहोच रस्ता उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -**

---

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स अदानी सिमेंटेशन लिमिटेड यांच्या मौजे शहाबाज व शहापूर, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र येथील अंबा नदीवरील प्रस्तावित प्रकल्प बर्थिंग जेट्टी, अतिरिक्त साठवणूक सुविधांसह कन्वेअर कॉरिडॉर व पोहोच रस्ता उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी सोमवार, दिनांक १८ एप्रिल, २०२२ रोजी दुपारी १२.३० वाजता जय मंगल कार्यालय, पांडवदेवी, पोस्ट-पोयनाड, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री रा. सं. कामत, उप प्रादेशिक अधिकारी, रायगड – २, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी डॉ. पदमश्री बैनाडे, अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड तथा अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री विद्यासागर किल्लेदार, प्रभारी प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,रायगड तथा सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, स्थानिक शेतकरी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक यांनी पुढे सांगितले की कोविडच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी काही निर्देश पारित करण्यात आले. त्यानुसार प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे व सॅनिटायझरचा वापर बैठकीच्या प्रवेशव्दारावर करण्यात आलेला असून बैठकीच्या स्थानावर प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवणे बंधनकारक असल्याने ते निर्देश पाळण्याची सूचना केली.

आयोजकांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मेसर्स अदानी सिमेंटेशन लिमिटेड यांच्या मौजे शहाबाज व शहापूर, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र येथील अंबा नदीवरील प्रस्तावित प्रकल्प बर्थिंग जेट्टी, अतिरिक्त साठवणूक सुविधांसह कन्वेअर कॉरिडॉर व पोहोच रस्ता उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग ७ (ई) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल विभागाची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सुचना, आक्षेप शासनास सादर करणे.

प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या पर्यावरण,वने व हवामान बदल विभागातील तज्ज्ञ समितीस प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर केला व त्या अर्जास भारत सरकारने दिनांक १३.१२.२०१८ सुधारित (Amendment) ०९.१०.२०१९ आणि ०६.१२.२०२१ रोजीच्या पत्राद्वारे (ToR) प्रदान केले.

जिल्हाधिकारी, रायगड, अलिबाग यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास सोमवार, दिनांक १८ एप्रिल, २०२२ रोजी मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई २६/२०२२, व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी २२०४०१-एफटीएस-००२५, दिनांक ०१.०४.२०२२ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणेबाबत समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी, रायगड, अलिबाग किंवा त्यांचे प्रतिनिधी (अप्पर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - **अध्यक्ष**

२) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड (महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी) - **सदस्य**

३) उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-२ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी मुंबई - **आयोजक**

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक कार्यालय, रायगड-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर दैनिक वृत्तपत्र कृषिवल, रायगड व सकाळ या स्थानिक वृत्तपत्रामध्ये मराठीत व इंडियन एक्सप्रेस या वृत्तपत्रात इंग्रजीत जनसुनावणीबाबत जाहिर सूचना दि. १७-०३-२०२२ रोजी व ऑनलाईन लिंकबाबत दि. ०१-०४-२०२२ रोजी जाहिर सूचना प्रकाशित करण्यात आलेली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता खालील कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते –

१) जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड
२) जिल्हा उद्योग केंद्र, रायगड
३) जिल्हा परिषद कार्यालय, रायगड

४) प्रादेशिक कार्यालय-रायगड, मप्रनि मंडळ, नवी मुंबई
५) उप प्रादेशिक कार्यालय-रायगड—२, मप्रनि मंडळ, नवी मुंबई
६) मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई
७) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालय, मुंबई
८) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर
९) तहसीलदार कार्यालय, पेण, अलिबाग, जिल्हा-रायगड,
१०) नगरपरिषद कार्यालय, पेण, जिल्हा-रायगड,
११) ग्रामपंचायत कार्यालये — मौजे शहाबाज व शहापूर, पोयनाड, घसवड, दामनपाडा, कमलपाडा, वालवड व पेजारी, तालुका — अलिबाग, जिल्हा-रायगड,
१२) ग्रुप ग्रामपंचायत कार्यालये- मौजे वडखळ, बेनेघाट, वावे, कोलवे, डोलवी तालुका-पेण, जिल्हा-रायगड
१३) संकेतस्थळ, म.प्र.नि.मंडळ

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी म.प्र.नि. मंडळास ई-मेलव्दारे व पत्राव्दारे काही आक्षेप प्राप्त झालेले आहेत व त्याच्या नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ती संधी देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

त्यांनी सांगितले की ही समिती प्रस्तावित प्रकल्पा संदर्भातील लोकांचे पर्यावरण विषयकचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून कोणताही निर्णय वा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. सदरहू सूचना /आक्षेप यांची इतिवृतांत नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डीग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकास सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयास सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावरील संभाव्य आघात, त्यासाठी तयार करण्यात आलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजना याबाबत माहिती दिली.

त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पात पर्यावरण व्यवस्थापनासाठी एकूण भांडवली गुंतवणूक रुपये २.५ कोटी आहे. तर पर्यावरण व्यवस्थापन देखभालीसाठी आवर्ती खर्च रुपये १.० कोटी एवढा प्रती वर्षी आहे.

सादरीकरण झाल्यानंतर उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी उपस्थित करण्याचे आवाहन करण्यात आले. पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की प्रकल्पाबाबत आपल्या पर्यावरणविषयक विचार, सूचना वा आक्षेप आहेत, त्या थोडक्यात मांडाव्यात. सूचना किंवा आक्षेप नोंदविताना आपले नाव व गावाचे नाव सांगावे.

**जाहिर जनसुनावणी दरम्यान खालील व्यक्तींनी चर्चेत सहभाग घेतला. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरण विषयांवर प्रश्न उपस्थित केले व त्यास प्रकल्प सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक यांनी पर्यावरणविषयक देण्यात आलेल्या माहितीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.**

बैठकीच्या सुरवातीस स्थानिक श्री नरेश म्हात्रे व इतर, गाव शहाबाज, ता. अलिबाग, जि. रायगड व इतर स्थानिकांनी जनसुनावणीस सभागृहात आले असताना प्रकल्पाच्या एका अधिका-याने स्थानिकांसोबत अपमानास्पद वर्तन केल्याबद्दल त्याला माफी मागून बैठकीच्या बाहेर काढण्याची मागणी केली. अध्यक्षांच्या आदेशानुसार संबंधित अधिका-याने माफी मागतली व त्यास सभागृहाच्या बाहेर काढण्यात आले.

१) **श्री अनिल परशुराम पाटील, राहाणार-पेझारी, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड,**

त्यांनी सांगितले की मी शहापूरचा शेतकरी असून शेतकरी संघर्ष समितीचा सचिव आहे.

अ) त्यांनी सांगितले की २००६ साली रिलायन्स एनर्जीचा प्रकल्प येत होता. त्या प्रकल्पाच्याविरुध्द आम्ही पर्यावरणीय हरकती घेतल्या. त्यानंतर भारत सरकारच्या पर्यावरण विभागाने काही मुद्दे उपस्थित केले होते. त्यावर आम्ही मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका (PIL) दाखल केली होती व प्रदूषणकारी प्रकल्प शहापूरला कार्यान्वित करता येणार नाही म्हणून प्रकल्पास माघार घ्यावी लागली होती.

ब) टाटा एन्व्हॉरो पॉवर प्रकल्प येथे येऊ घातला होता. शहापूरच्या काही नागरिकांना तो हवा होता. एमआयडीसीत त्यांनी जमिन अधिग्रहण केली. पण गेले १०-१५ वर्षे झाली, अजुनही तो प्रकल्प सुरु झालेला नाही.

क) २०११ साली शहापूरला एमआयडीसीने अधिग्रहण करण्यास सुरवात केली. त्यास मोबदला जाहिर झाला नाही, पण तीन वर्षे झाली, त्यामुळे ती नोटीस set aside होते.

ड) चौथा प्रकल्प हा आता अदानी ग्रुपचा येतो. तर Conveyor Belt व Jetty ज्याठिकाणी स्थापित करणार आहेत, तो शहापूर येथे सर्व्हे नं. ५९६ वर आहे. सर्व्हे नं. ५९५ हा सरकारी गुरचरणासाठी राखीव आहे. तेथे हजारो मँग्रसोची झाडे (कांदळवन) आहेत. आमचा प्रकल्पाला विरोध नाही. मात्र आमच्या अडचणी सोडविण्यात याव्यात. Conveyor Belt व Jetty साठी १५० मँग्रोसची झाडे तोडावी लागतील. त्या १५० झाडांचे पुनर्वसन कसे करण्यात येईल याबाबत माहिती सांगण्यात यावी. कारण एका झाडासाठी दहा झाडे लावण्याची हमी त्यांनी दिलेली होती. ती झाडे कुठल्या भागात लावणार, त्या जागेची मोजमाप केले असल्यास त्याची माहिती उपलब्ध करण्यात यावी.

श्री अनिल पाटील यांनी पुढे सांगितले की एमसीझेडएमएने (MCZMA) दिनांक ४ डिसेंबर, २०२० रोजी १४९ व्या बैठकीतील निरिक्षणानुसार ह्या प्रकल्पातील Conveyor Corridor, पोहोच रस्ता/Approach Road हे सीआरझेड-१ मध्ये आहेत. जेटीसुध्दा आहे. श्री पाटील यांनी सांगितले ह्या सर्व मुद्द्यांवर स्पष्टीकरण कंपनीने द्यावे, अन्यथा आम्ही भारत सरकारच्या Environment Appellate Authority कडे अपिल करणार आहोत.

त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की conveyor corridor हा सर्व्हे नं. ५९६,५९८,६०१,६०२, शहाबादमधील ३४६ महाराष्ट्र शासनाच्या राखीव वन क्षेत्रात आहेत. त्यात कांदळवन व गुरचरण जागा आहेत. प्रस्तावित प्रकल्पाची जागा ही राखीव वनाच्या ५० मीटर्सच्या बफर झोनमध्ये आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी मा. उच्च न्यायालयाच्या पूर्वपरवानगीशिवाय कांदळवनास हातही लावता येणार नाही.

सीआरझेड, २०११ प्रमाणे सादरीकरणात पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात पर्यावरणात कोणातही बदल होणार नाही याबाबत स्पष्टीकरण देणे अपेक्षित होते. ते दिलेले नाही.

त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पामुळे तेथील स्थानिकांच्या मच्छिमारीवर होणारा परिणाम, सिमेंट दळणामुळे होणार सागरी पाण्याचे प्रदूषण व त्यांवर उपाययोजनांची नोंद अहवालात नाही. प्रकल्प प्रवर्तकांनी सीआरझेड, २०११ प्रमाणे विविध मुद्यांवर स्पष्टीकरण देणे अपेक्षित आहे. सीआरझेडनुसार सागरी किना-याचे संरक्षण करणे हे कायद्याने बंधनकारक आहे.

श्री पाटील यांनी सांगितले जरी सदरहू प्रकल्पा पर्यावरण अनुमती प्राप्त झाली, तरीही आम्ही स्थानिक यांच्याविरुध्द अपिलात जाणार आहोत.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांना प्रत्येक मुद्‌द्यांवर उत्तर देण्याची सूचना केली.

प्रकल्प प्रवर्तकांच्या सल्लागार यांनी सांगितले की प्रस्तावित बंदर हे लहान आहे. त्यात आम्ही भराव टाकणार नाही. बंधारा टाकणार नाही. जेट्टी ट्रेसलप्रकारची असल्याने प्रवाहाला अडथळा होणार नाही. कांदळवनाबाबत उत्तर देताना सांगितले की भारत सरकारची कठोर मार्गदर्शक तत्वे (Strict Guidelines) पालन केल्याशिवाय प्रकल्पास परवानगी देताच येत नाही. त्यावेळी उपस्थितांनी कांदळवन संवर्धनासाठी जागेची माहिती देण्याची जोरदार मागणी केली. प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की जागा निश्चिती ही MCZMA कडून केली जाते. सामाजिक वनीकरण विभाग त्याबाबत पुढील कार्यवाही करते.

अध्यक्षा यांनी पर्यावरण सल्लागार यांना सूचना केली की पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालातील अटी व शर्तींचे पालन कसे करण्यात येईल असा प्रश्न उपस्थित करण्यात आलेला होता. त्याबाबत उत्तर देण्यात यावे.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की भारत सरकारकडून प्रथम कंपनीकडून अटी व शर्तींचे पालन करण्यासाठी हमी पत्र (Undertaking) घेतले जाते. त्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची देखरेख असते.

**२) सौ. करुणा धुमाळ, गाव पेझारी, ता अलिबाग, जि. रायगड, महिला प्रतिनिधी, संघर्ष समिती:-**

सौ. धुमाळ यांनी विचारले की आपण शासनास पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल सादर केला का? त्यास पर्यावरण सल्लागार यांनी होकारार्थी उत्तर दिले. त्यावेळी सौ. धुमाळ यांनी उत्तर दिले की सदरहू अहवाल हा परिपूर्ण नाही. हा अहवाल हा कंपनीच्या बाजूने केलेला आहे. हा अहवाल भूमीपुत्रांच्या फायदाच्या नाही. हा अहवाल आमच्या भूमीपुत्रांची फसवणूक आहे. हा अहवाल आम्हांला मान्य नाही.

३) **श्री मोहन धुमाळ, राहणार शहाबाज, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगडः-**

त्यांनी सांगितले की मी भूमीपुत्र असून माझी १०.५ एकर जमिन प्रकल्पासाठी दिलेली आहे. आम्ही कंपनीचे स्वागत करतो. फक्त प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रदूषण होणार नाही याबाबत लक्ष द्यावे. आमच्या मुलाबाळांना रोजगाराची संधि मिळणे हे जास्त महत्वाचे आहे.

४) **श्री. कुमार बैकर, गाव कमलपाडा, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगडः-**

त्यांनी सांगितले की मी माझी १५ एकर जागा कंपनीस दिली आहे. माझा या प्रकल्पास पाठिंबा आहे. गावातील मुलांना रोजगार मिळेल.

५) **डॉ. प्रविण केशव धुमाळ, गाव शहापूर, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड अध्यक्ष, विस्तार विरोधी संघर्ष समितीः-**

या प्रकल्पास आम्हा शेतक-यांचा विरोध आहे. जर मोक्याची जमिन अडवली, तर इतर जमिनीचे मूल्य कमी होईल. प्रकल्पास आमचा विरोध नाही, पण सरकारी जमीन ही खाजगी उद्योगाला देण्यास आमचा विरोध आहे. कारण आमची शेतजमिन आहे, या जमिनीवर आमची पिढ्यानुपिढ्या उपजीविका चालत आहे. त्यामुळे या जमिनी खाजगी उद्योगास देण्यास आमचा विरोध आहे. जर त्यांनी जमीन खरेदी करायची असेल, तर सर्व्हे नं. २०३ ते ५९६ सर्व्हे नंबर पर्यंत जमिन खरेदी करा. कांदळवन पर्यटन ही संकल्पना सुरु केलेली आहे. तर कांदळवन प्रकल्पासाठी कसे नष्ट करता? अहवालात धरमतर खाडीचा उल्लेख आहे. काही दिवसांपूर्वी अमेरिकेच्या अभ्यासगटाने कांदळवन सफारीचा आनंद घेतला आहे.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की तुमच्या सर्व प्रश्नांची नोंद झालेली आहे. आपणास कंपनीकडून उत्तर दिले जाईल. कोणाचीही जमिन आम्ही बळकावणार नाही. ज्या जेटी बोलतो, तेथे कुठलीही शेतजमिन येणार नाही. वॉटर फ्रन्ट व मँग्रोसबाबत उत्तर देण्यात आलेले आहे. तुमच्या पूर्वपरवानगीशिवाय कुठलीही गोष्ट करण्यात येणार नाही, याची ग्वाही स्थानिकांना देण्यात येते.

६) **श्री व्दारकानाथ पाटील, कमलपाडा, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगडः-**

कंपनीने सादर केलेली सर्व माहिती ही बोगस आहे. गट नं. ३३५, ३३६ हे समुद्रालगतची जागा आहे असा सरकारी रिपोर्ट आहे. माझ्याकडे सरकारी पुरावा आहे. यास भारत सरकारची परवानगी लागेल. जर लगतच्या या जमिनीगट बंद केल्यास पाणी जाणार कुठे, आता तेथे तळी खोदलेली आहेत. ह्या कंपनीचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल जर ग्रामपंचायतीस पाठवविला, तर त्याबाबत ग्रामसभेत चर्चा झालेली नाही, अडाणी, गरिब शेतक-यांना या प्रकल्पाबाबत काहीही माहिती सांगण्यात आलेली नाही.

त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की शहाबाजच्या गट नंबर ३४६ मधील एक एकर सत्तावन्न गुंठे जागा आणि त्याच सर्व्हे नंबरमधील सात एकर आणि २४ गुंठे जागा ही वनखात्याकडे वर्ग करण्यात आलेली आहे. तेथे १५० नाहीत, तर १,५०,००० मँग्रोस असून त्याचे संवर्धन कसे करणार हे प्रकल्प प्रवर्तकांना सांगता येत नाही.

७) **<u>श्री रुपेश पाटील, गाव-शहाबाज, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगडः-</u>**

श्री रुपेश पाटील यांनी आक्षेप नोंदविला की सदरहू प्रकल्प सल्लागार यांनी शासनास प्रदूषणाबाबत अहवाल दिलेले आहेत. तर त्यांनी काय केले, याचे उत्तर द्यावे, नंतर आम्ही आमच्याकडील पुरावे देतो.

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की दोन वेळा Terms of Reference (ToR) आम्ही तयार केला असून त्याचा संपूर्ण अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास सादर करण्यात आलेला आहे. त्यांना प्रदूषण न होण्यासाठी उपाययोजनांची माहिती दिली.

अध्यक्षांनी पुढील प्रश्न विचारण्याची सूचना केली. त्यावेळी श्री पाटील यांनी पर्यावरण सल्लागार हे दिशाभूल करणारी व चुकीची उत्तरे देत आहेत असा आरोप केला. त्यांनी सांगितले की जर जनसुनावणी लावतात, तर सर्व प्रश्नांची उत्तरे असणे गरजेचे आहे.

८) **<u>सौ. करुणा प्रवीण धुमाळ, गाव पेझारी, ता अलिबाग, जि. रायगड महिला प्रतिनिधी, संघर्ष समितीः-</u>**

सौ. करुणा धुमाळ यांनी प्रश्न विचारला की जर अदानी कंपनी जेटी उभारणार आहे, तर भूसंपादन कसे करण्यात येईल? एमआयडीसी, स्वतः अदानी वा दलालामार्फत करणार आहेत? त्यांनी मत मांडले की आमचा भूमीपुत्र अशिक्षित आहे, त्याची फसवणूक होऊ नये. खरेदी कोण करणार?

प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की प्रकल्पासाठी जी जमिन लागणार आहे, ती आम्ही खरेदी केलेली आहे. आता जेटीचा प्रश्न आहे, तर जेटीसाठी आम्ही कुठलीही खाजगी जमिन विकत घेणार नाही. भविष्यात जर गरज लागली, तर शेतक-यांशी चर्चा करुनच ती विकत घेण्यात येईल.

यावेळी सौ. करुणा धुमाळ यांनी स्थानिक शेतक-यांना सावध राहण्याची सूचना केली व आपल्या जमिनी न विकण्याचे आवाहन केले. शासनाच्या अटी व शर्तींचे पालन करुनच जमिन विकण्यात यावी.

९) **<u>श्री राजेंद्र पाटील, राहणार-पेण, तालुका-पेण, जिल्हा-रायगडः</u>**

श्री राजेंद्र पाटील आक्षेप नोंदविला की प्रकल्पा स्थानावर दाट कांदळवन असतानाही सादरीकरणात फक्त ०.६४ हेक्टर दाखविले आहे. दाट कांदळवन असताना तेथे फक्त १५० मॅंग्रोस कशी असतील? त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की हा संपूर्ण प्रकल्प सीआरझेड-१, २, ३ व ४ मध्ये येतो. एमसीझेडएमए नी १४५ व्या बैठकीत दर्शविले आहे की दाट मॅंग्रोस जंगलामुळे प्रकल्प दुसरीकडे हलवा. तर १४९ व्या बैठकीत एमसीझेडएमए परवानगी कुठल्या मुद्द्यावर दिली.

त्यांनी पुढे प्रश्न विचारला की उत्पादन प्रक्रियेत जे स्लॅग उत्पन्न होईल, त्यावर प्रक्रिया करुन ते कसे विल्हेवाट (disposal) करण्यात येईल, त्यासाठी कंपनीकडे तेवढी साठवण क्षमता (storage capacity) आहे का? प्रकल्प अहवालातच उल्लेख आहे की कांदळवन तोडावे लागेल, खाजण जमिनीत बदल करावा लागेल, पाण्याचे प्रदूषण होणार आहे. या पाण्याच्या प्रदूषणामुळे शेती पूर्णपणे नष्ट होईल.

कंपनीच्यी वेस्ट मटेरिअलमुळे पाणी तुंबेल. त्यामुळे शेती नापीक होईल. मासेमारीवर परिणाम होईल. जेएसड्ब्लुमुळे पेण तालुक्यातील कित्येक हजारो जमिन ही नापीक झालेली आहे. त्यासाठी राष्ट्रीय हरित लवादामध्ये याचिका दाखल केलेली आहे. गेले आठ वर्षे आम्ही भांडत आहोत.

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की ६ हेक्टर जागा विकत घेतली आहे, त्याचे वर्गीकरण केलेले आहे. त्यातील २ हेक्टर हे वॉटर फ्रन्टसाठी आहे. तेथील स्थानिक मासेमारीची नोंद घेण्यात आलेली आहे. प्रकल्पामुळे जे मच्छीमार बाधित होत आहेत, त्यांना मोबदल्याची तरतुद करण्यात आलेली आहे. उपस्थितांनी याबाबत अहवाल तयार केला का अशी विचारणा केली. उपस्थितांनी या मुद्द्यावर मोठ्या आवाजाने नाराजी व्यक्त केली व सांगितले की जवळजवळ ४,५०० मच्छिमार हे अलिबाग तालुक्यात मच्छिमारी करतात. त्यावेळी उपस्थितांनी किती मच्छीमारांची यादी तयार केली, याबाबत विचारणी केली.

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की ज्या क्षेत्रात आमचा प्रकल्प येत आहे व ज्याठिकाणी मच्छिमार हे बाधित होत आहेत, त्यांना भरपाई मिळेल. त्या बाधीत मच्छिमारांची यादी ही मत्स्यव्यवसाय विभाग (Fisheries Department) कडून प्राप्त करण्यात येईल.

कांदळवनाबाबतच्या पत्रास उत्तर देताना सांगण्यात आले की सदरहू जेटी ही ट्रेसल प्रकारची आहे. समुद्रात आधि खांब टाकले जातात. त्यावर जेटी बांधली जाते. भराव टाकणार नाही. त्याचप्रमाणे जो Conveyor आहे, त्यालाही स्तंभ असतात. तो जमिनीवर येत नाही. त्यामुळे मँग्रोसचे नुकसान हे कमीतकमी होईल.

१०) **<u>सौ. समिता राजेंद्र पाटील, राहणार-पेण, तालुका—पेण, जिल्हा-रायगडः-</u>**

सौ. समिता पाटील यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की गेले आठ वर्षे हे conveyor belt च्या त्रासामुळे लढत आहेत. त्यामुळे conveyor belt बाबत सांगू नका, तर मँग्रोस कसे वाचतील याबाबत सांगा. त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की गुरचरणाच्या जमिनी येथील भूमीहिनांना मिळत नाही, तर त्या उद्योजकांना कशा मिळतात? त्यांनी आरोप केला की गट नं.५९६ ही शहापूरची जमिन हा उद्योग घेणार आहे असें मी ऐकले.

त्यावेळी काही उपस्थितांनी जेएसड्ब्लु कंपनीच्या conveyor belt उल्लेख केला असता त्यावेळी अध्यक्षा यांनी जनसुनावणी ज्या प्रस्तावित प्रकल्पाविषयी त्याबाबतच सूचना, आक्षेप नोंदविण्याची सूचना केली. त्यावेळी उपस्थितांनी आक्षेप नोंदविला की जर हा प्रकल्प सीआरझेड-१,२,३ मध्ये आहे, तर प्रकल्प होऊच शकत नाही.

प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर देताना सांगितले की शहापूरमध्ये आमच्याकडे फक्त गट नं. ६०० आणि ६०२ एवढेच आहेत. त्यांनी पुढे उत्तर दिले की एससीझेडएमएने १४५ व्या बैठकीत सांगितले होते की आपण दुस-या पर्यायी जागांचा अभ्यास करावा. प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की इतर जागांचा अभ्यास केल्यानंतरच या जागेस परवानगी एससीझेडएमएने दिलेली आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी पुढे सांगितले की एससीझेडएमए, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महसूल खाते यांनी घालून दिलेल्या अटी व शर्तींचे पालन करण्यात येईल.

**११) श्री प्रवीण म्हात्रे, राहणार-वावे, तालुका-पेण, जिल्हा-रायगड**

श्री प्रवीण म्हात्रे यांनी प्रश्न विचारला की या कंपनीसाठी होणारी मालवाहतुक ही जहाजातून होणार असून ती धरमतर खाडीतून, अंबा खाडीतून होणार आहे. आताच प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की धरमतर खाडीतील गाळ काढणार आहोत. त्यामुळे आजूबाजूच्या चार ग्रामपंचायतीची जवळजवळ २१००-२२०० एकर जमिन आहे. त्या शेतीला असलेल्या बांधा आधिच्या दोन कंपन्यामुळे- फुटलेल्या आहेत. आतापर्यंत २१००-२२०० एकर जमिन ही पूर्णपणे नापीक झालेलीच आहे. नवीन जेटीमुळे बार्जेस चालतील. या जेटीचा फायदा त्या भागातीलच शेतक-यांना मिळणार आहे. जर दुस-या भागातील शेतक-यांना याचा लाभ मिळत नसेल, तर आमची या जेटीला विरोध आहे. याचा लाभ जर सर्व शेतक-यांना मिळत असेल, तरच आम्ही या प्रकल्पाचे स्वागत करु.

प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की दरवर्षी ३०,०००.० घनमीटर एवढा गाळ काढण्याची शक्यता आहे. हा गाळ कंपनीच्या जागेतच भरावासाठी वापरला जाईल व उरलेला गाळ अलिबागपासून ३० कि.मी. अंतरावर शासनाने प्राधिकृत्त केलेल्या जागेतच तो टाकला जाईल. दुसरीकडे कोठेही टाकण्यात येणार नाही.

**१२) श्री सुहास नारायण पाटील, राहणार-शहापूर, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगडः-**

श्री सुहास पाटील यांनी अध्यक्षा यांना प्रश्न विचारला की प्रस्तावित प्रकल्पास शासनाने एकगठ्ठा जमिन मंजूर केली का, त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पास शासनाने परवानगी दिली आहे काय? जर प्रस्तावित प्रकल्पासाठी जमीनच त्यांची नाही, तर हा प्रकल्प कसा कार्यरत होईल? म्हणजे सदरहू जनसुनावणी ही बेकायदेशीर आहे.

श्री सुहास पाटील यांनी पुढे मत मांडले की येथे स्थानिक व शेतकरी बंधु यांनी या प्रकल्पाविषयी मत मांडले. काहींनी प्रकल्पाच्या बाजूने मत मांडले, ब-याचजणांनी प्रकल्पास विरोध केला आहे. मात्र पर्यावरणविषयक जनसुनावणी असूनही अध्यक्षा व प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी हे उत्तर देत नसुन कंपनीचे अधिकारी उत्तर देत आहे.

यावेळी अध्यक्षा यांनी उत्तर दिले की सदरहू जनसुनावणीस अध्यक्ष म्हणून स्थानिकांची बाजू ऐकण्यासाठी व कंपनीची पर्यावरण व्यवस्थापन योजना ऐकण्यासाठी आलेली असून अध्यक्ष यांनी काही बोलणे अपेक्षित नाही.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की काही विशिष्ट उद्योगांना प्रकल्प सुरु होण्याअगोदर पर्यावरण अनुमती प्राप्त करणे बंधनकारक आहे. त्यासाठी प्रथम संबंधित प्रकल्पास केंद्र किंवा राज्य शासनाची पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करणे, त्यासाठी प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघात प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावर होणा-या संभाव्य परिणामाचा अभ्यास करणे बंधनकारक आहे. तो अभ्यास पूर्ण झाल्यानंतर त्यातील पुढील टप्पा ही जनसुनावणी आयोजित करणे हा असून सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हे जनसुनावणी समिती गठित करतात. जनसुनावणी जिल्हादंडाधारी किंवा त्यांचे प्रतिनिधी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करणे बंधनकारक असून त्यात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रतिनिधी म्हणून संबधित प्रादेशिक अधिकारी सदस्य म्हणून तर उप प्रादेशिक अधिकारी हे

आयोजक म्हणून कामकाज पाहतात. सदरहू जनसुनावणी ही स्थानिक लोकांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना, विचारी किंवा आक्षेप नोंदविण्यासाठी असून स्थानिकांचे मत केंद्र किंवा राज्य सरकारला सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत योग्य तो निर्णय घेते. ही जनसुनावणी प्रस्तावित प्रकल्पाबाबत आपले पर्यावरणविषयक विचार, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठीच आहे.

त्यावेळी सुहास पाटील यांनी मत मांडले की प्रकल्पाची प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेविषयी स्थानिक शेतक-यांना प्रथम माहिती देण्यात यावी. त्यावेळी अध्यक्षा यांनी सांगितले की जनसुनावणीचे इतिवृत्त स्थानिकांना उपलब्ध करुन देण्यात येईल. पारदर्शक प्रक्रिया राबविण्यात येते. संपूर्ण जनसुनावणीचे व्हिडिओ शुटिंग घेण्यात येत आहे. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची कार्यवाही (Proceedings) ही लिहून घेण्यात येत आहे.

श्री सुहास पाटील यांना पुढे सांगितले की जर प्रकल्पासून प्रदूषणाचा कोणताही त्रास होणार नसले, स्थानिकांना रोजगारची संधि देणार असेल तर मी व्यक्तीशः प्रकल्पास समर्थन करतो, कारण स्थानिक युवक युवतींना रोजगाराची गरज आहे.

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की रोजगाराच्या संधिबाबत हा प्रश्न होता. तर सादरीकरणात दर्शविल्याप्रमाणे बांधकाम टप्प्यामध्ये ४० व्यक्तींना प्रत्यक्ष रोजगाराची संधि मिळू शकते. तर त्याचा फायदा ४०० व्यक्तींना अप्रत्यक्ष फायदा होऊ शकेल. तर प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर प्रत्यक्ष रोजगाराची संधि ही १० व्यक्तींनी मिळू शकते, तर अप्रत्यक्ष १०० व्यक्तींना त्याचा फायदा होईल. प्रकल्पात सर्व स्थानिक व्यक्तींनाच संधि देण्यात येईल.

**१३) <u>श्री प्रवीण म्हात्रे, राहणार- धामणपाडा, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगडः-</u>**

श्री प्रवीण म्हात्रे यांनी सांगितले की माझा सर्व जमिन ही शहापूर खाडीत आहे. त्यांनी सांगितले की बांधकाम टप्प्यात ४० व्यक्तींना प्रत्यक्ष व ४०० लोकांना अप्रत्यक्ष रोजगार, तर प्रकल्प कार्यान्वित करताना फक्त १० व्यक्तींना प्रकल्पात रोजगार तर अप्रत्यक्ष १०० व्यक्तींना अप्रत्यक्ष रोजगार मिळणार. म्हणजे या प्रकल्पाचा स्थानिकांना काय फायदा होणार हे सर्वांच्या लक्षात येईल. त्यांनी पुढे प्रश्न विचारला की जर पर्यावरण सल्लागार यांनी येथील पर्यावरणाचा, जलसृष्टीचा अभ्यास केला आहे, तर माश्यांच्या किती प्रकारच्या प्रजाती या खाडीत मिळतात याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे. प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की खा-या व गोड्या पाण्यातील अशा ५० माशांच्या प्रजाती आढळतात. श्री म्हात्रे यांनी रोहू, कटला, मृगल आणि जिताडा ही अहवालातील नांवे सांगितली. हे सगळे गोड्या पाण्यातील मासे आहेत. ज्यावर आमचा उदरनिर्वाह चालतो, त्यांचा उल्लेख नाही आणि फक्त दहा व्यक्तींना रोजगार देणारा हा प्रकल्प असले तर अशा प्रकल्प आम्हांला नको. त्याचप्रमाणे प्रकल्पातील जो गाळ आहे, त्याने प्रकल्पात व शेजारील जागेत टाकून तेथील जमिन खराब करतील. त्यावेळी प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की जेवढी क्षमता आहे, तेवढाच गाळ टाकण्यात येईल व अतिरिक्त गाळ हा ३० कि.मी. लांब सरकारी जागेतच टाकण्यात येईल.

श्री म्हात्रे यांनी पुढे प्रश्न विचारला की जो खारफुटी बंधारा नष्ट होत आहे, त्यामुळे हजारो एकरची शेतजमीन नापीक होत आहे.

त्यावेळी अध्यक्षा, पर्यावरणविषचक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प अधिका-यांना श्री म्हात्रे यांच्या प्रश्नाचा उद्देश सांगितला की ज्या बार्जेस येणार आहेत, त्याच्यामुळे जे खारफुटी बंधारे तुटतील, त्यामुळे शेतजमिनीत जे खारे पाणी घुसणार आहे, त्याबाबत प्रश्न विचारत आहेत.

प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की जेटी बांधताना याची काळजी घेतली जाते. येथे मोठी जहाजे येणार नाहीत, तर छोटी बार्जेस येणार आहेत. येथे नुकसान झाल्यास कंपनीचेच नुकसान होणार, त्यामुळे काळजी घेण्यात येईल. येथे कंपनीची पर्यावरण संघ कार्यरत राहणार आहे.

श्री म्हात्रे यांनी विचारले की आमची साधा प्रश्न आहे की येथे कॉक्रीट संरक्षक भिंत असेल का? यास प्रकल्प अधिकारी यांना होकारार्थी उत्तर दिले. प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की सादरीकरणात दर्शविल्याप्रमाणे पन्नास लाखाची तरतुद करण्यात आलेली असून जास्तीचे लागण्यात ते खर्च करण्यात येतील.

यावेळी अध्यक्षा यांनी सांगितले की सीआरझेड निकषांप्रमाणेच साहित्य वापरुन संरक्षक बंधारा बांधण्यात येईल.

प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की शासनाने वेळोवेळी पारित केलेले नियम पाळण्यात येतील व पर्यावरणाचा नाश व कोणासही उपद्रव न होण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्री म्हात्रे यांनी प्रश्न विचारला की सदरहू प्रकल्पामुळे किती मच्छिमार व शेतकरीबंधु बाधित होतील?

प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की या प्रश्नाचे उत्तर पूर्वी दिल्याप्रमाणे मत्स्यउत्पादन विभागाकडून याबाबत बाधितांची संख्या घेण्यात येईल व त्याप्रमाणे त्यांना मोबदला दिला जाईल.

श्री म्हात्रे यांनी आरोप केला की हा जेटी प्रकल्प प्रदूषणकारी असून स्थानिक शेतक-यांना नुकसान करणारा आहे. येथील जलसृष्टी नष्ट होण्याची जास्त शक्यता आहे. बंधारा फोडून प्रकल्प उभारणी होणार आहे. तरी आमचा या प्रकल्पाला विरोध आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की १७२ कोटींचा प्रकल्प आहे. पर्यावरणाची काळजी घेण्यात येईल सर्व प्रश्न चर्चेतून सोडविण्यात येतील. जेटी ही पाण्यावर येणार आहे, फक्त Conveyor Belt चा काही भाग हा जमिनीवर येणार आहे.

**१४) श्री संजयकुमार पाटील, राहणार-शहापूर, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगडः-**

त्यांनी आक्षेप नोंदविला की प्रकल्प परिसरात मँग्रोसचे दाट जंगल आहे. तेथे रानटी प्राणी आढळतात. तेथे जेटीचा बंधारा करता येईल काय? श्री पाटील यांनी विचारेल की शहाबाज ते शहापूर जो सरकारी पट्टा आहे, त्यात एवढे मँग्रोस आहेत की माणसाला जाता येत नाही, तेवढे मँग्रोस नियमाप्रमाणे आपणास तोडता येतील काय? शहाबाज ते शहापूर जो बंधिस्त पट्टा आहे, त्याची लांबी रूंदी सांगू शकला काय?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की कुठलाही सरकारी नियम डावलून काम करणार नाही. जेटी ही पाण्यावर येणार आहे, फक्त Conveyor Belt चा काही भाग हा जमिनीवर येणार आहे.

त्यावेळी श्री संजयकुमार पाटील यांनी सांगितले की आमचा प्रकल्पाला विरोध नाही. पण जर मॅंग्रोस तोडता येत नाही, तर तसे सांगा व तोडता येत असेल, तर शासकीय नियम दाखवून ते तोडा. तोडण्याची परवानगी असल्यास शासकीय लेखी पत्र दाखवा.

प्रकल्प अधिकारी यांना सांगितले की भारत सरकार ज्या अटी व शर्ती घालून जेटी उभारणीस परवानगी देईल, त्या अटी व शर्ती आम्ही पाळणार आहोत. त्यांनी पुढे सांगितले की मॅंग्रोसबाबत मुद्दा उपस्थित केलेला असता, जेटी कशी असेल याबाबत माहिती सांगितली आहे.

श्री संजयकुमार पाटील यांनी सांगितले की आम्ही शहाबाज, शहापूर, धामणपाड्याचे मच्छिमार आहोत. महाराष्ट्र शासनाकडेही कितीजण मच्छिमारी करतात हा डेटा नाही. तर आपल्याकडे कसा आला, आपण आधी शास्त्रोक्त सर्वेक्षण करणे गरजेचे होते. मच्छीमारी कुठली करतात, कशी मच्छीमारी करतात याचे काही उत्तर आहे काय? २६-३-२०२१ ला मच्छिमारांसाठी एक समिती नेमली होती, त्याचा अहवाल आला आहे काय?

**१५) <u>डॉ. वैशाली पाटील, समन्वयक, ता. पेण, जि. रायगड कोकण विकास समनव्यक समिती व कोकण प्रकल्प समिती, प्रतिनिधी आदिवासी समिती, स्वयंसेवक समिती:-</u>**

त्यांनी सांगितले की पहिल्यापासून (श्री अनिल पाटील) ते आतापर्यंत विविध ३६ आक्षेप हे स्थानिकांकडून नोंदिविलेले आहेत. या सर्व ३६ आक्षेपांना मी पाठिंबा देते, कारण ते शेतक-यांचे आक्षेप आहेत.

त्यांनी सांगितले की पहिला आक्षेप –

अ) अशी पर्यावरणाची जनसुनावणी बघितली नाही. ईआए – म्हणजे Environment Impact Assessment (EIA) report ज्यास मराठीत पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल म्हणतात, ह्या संपूर्ण अहवालाचे भाषांतर स्थानिकांना/प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या भाषेतच सविस्तर उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. येथे अहवाल मराठीत मिळणे अपेक्षित आहे. तो आम्हांला मिळालेला नाही. शासनाने कंपनीमार्फत व कंपनीने प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत जो उपलब्ध करुन दिलेला आहे, तो Summary Report of EIA आहे, not full report of EIA. त्यामुळे माझी पहिला आक्षेप आहे की ज्याच्यावर पर्यावरणीय जनसुनावणी आयोजित करता, तो अहवालच शेतक-यांना उपलब्ध करुन देत नाही, तर जनसुनावणी कशी घेता?

ब) दुसरा आक्षेप पर्यावरणाच्या जनसुनावणीमध्ये जे शेतकरी आहेत, ज्यांनी बंड करुन कुळकायद्याची स्थापना केलेली आहे आणि ह्या जमिनीवर आगरी, कोळी, कुणबी, मराठा, भोईच नाही, तर आदिवासीसुध्दा या जमिनीवर जगतो, कारण आग-यांकडे जेव्हा शेती असते, तेव्हा आदिवासीस मजूरी मिळते. जेव्हा तुमच्याकडे चिंबोरी येते, तेव्हा आम्हांला भाकरी मिळते, जेव्हा तुमच्याकडे मच्छी येते, तेव्हा आमच्याकडची चूल पेटते असे आमचे आदिवासी म्हणतात. म्हणून हा प्रश्न फक्त या भूमीचाच नाही,

तर जिल्ह्यातील जे बारा बलुतेदार आहेत आणि शेतक-यांची शेती गेली, मच्छिमारांची मच्छि गेली, खाजण जमिन गेली, तर आदिवासी भूकेने मरेल, म्हणून माझा या मागण्यांना पाठिंबा आहे.

क) जनसुनावणीत शेतक-यांनी, प्रकल्पगस्तांनी उपस्थित केलेल्या आक्षेपांना प्रकल्प अधिकारी यांनी ईआयएचा आधार/दाखला घेत शास्त्रीय उत्तरे देणे अपेक्षित आहे. येथे एक अधिकारी एका बाजूने बोलतो, तर दुसरा कंपनीतर्फे आश्वासन देतो, ही कसली जनसुनावणी,

ड) हे शेतकरी ईआयएचा अभ्यास करुन आलेले शेतकरी आहेत. कायदेतज्ज्ञाना लाजवतील असे त्यांचे आक्षेप आहेत. कंपनीने काढलेल्या कायद्यांच्या पळवाटांवर बोट ठेऊन आक्षेप नोंदवित आहेत. तरी माझा आक्षेप आहे की या जनसुनावणीत तंत्रशुध्द उत्तरे हे आक्षेपांना देण्यात येत नाहीत.

इ) ही जनसुनावणी ज्या ईआयए अहवालावर आयोजित करण्यात आलेली आहे, तो अहवाल कोणी बनविला, तर अदानी यांनी नियुक्त केलेल्या संस्थेने बनविलेला आहे. त्यासाठी अदानी समुहाने पैसे दिलेले आहेत. त्या अहवालात शेतक-यांची बाजू कशी असेल?

ई) हे भांडण कुठले आहे, तर जेटीवरिल उपजीविकेवर व जेटीमुळे पिढ्यानुपिढ्या राहणा-या स्थानिकांच्या जीवनावर, येथील मासेमारीवर होणारा संभाव्य दुष्परिणाम येथील शेतीवर, येथील आदिवासाच्या पोटावर होणार परिणाम. या जेटीचा वाहतुकीसाठी उपयोग होणार असून त्यातून येणार आहे, तर सिमेंट. ईआयएमध्ये असे सांगितले की मागणी व पुरवठा यांची तफावत पूर्ण होण्यासाठी या जेटीचा वाहतुकीसाठी उपयोग होणार आहे. तर सिमेंटची मागणी ही शेतक-यांची नाही. सरकारी अहवाल असे सांगतो की भारतात ३,००० मिलियन टन सिमेंट हे जास्तीचे उत्पादन होत आहे. जगात व्हिएटनाम व भारत ह्या दोन देशात सिमेंटचे उत्पादन हे जास्तीचे आहे. आम्हांला उद्योग हवेत, रोजगार हवेत. मात्र ज्या उद्योजकाचे नांव चांगले नाही, त्याचा प्रदूषणकारी प्रकल्प नको. प्रकल्प सुरु झाल्यावर फक्त दहा लोकांना या उद्योगात रोजगाराची संधि मिळणार आहे. या अदानी उद्योगसमुहाने देशात शेतक-यांना व पर्यावरणाचे नुकसान केलेले आहे. ज्या प्रकल्पाची आमच्या देशाला गरज नाही, ज्या प्रकल्पाची स्थानिकांनी मागणी केलेली नाही, ज्या प्रकल्पामुळे स्थानिक मच्छिमार, शेतकरी व आदिवासी हे देशोधडीला लागतील, असा प्रकल्प नको. त्याचप्रमाणे आतापर्यंत जे आक्षेप नोंदविले गेलेले आहेत, त्यांना पाठिंबा. तरी सदरहू जनसुनावणी ही रद्द करुन कायदेशीर जनसुनावणी घेण्यात यावी.

१६) **<u>श्री अंबादास पाटील, राहणार-शहापूर, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड:-</u>**

बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या पर्यावरणीय प्रश्नांना प्रकल्पाच्या अधिका-यांनी समाधानकारक उत्तरे दिलेली नाहीत. त्यामुळे सदरहू प्रकल्प हा शाश्वत आहे की नाही व नंतर निघून जाणारा आहे, अशी स्थनिकांना भिती वाटते. येणार प्रकल्प प्रथम शाश्वत असला पाहिजे.

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की सदरहू प्रकल्प हा शाश्वत प्रकल्प असेल. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्प हा पर्यावरणीय शाश्वत (Environmental Sustainable) असेल. सर्व पर्यावरणाचे निकष पाळण्यात येईल. त्याचप्रमाणे वेळोवेळी सुधारणा करण्यात येईल.

यावेळी अध्यक्षा यांनी सांगितले की प्रश्नकर्त्याचे असे मत हे की सदरहू प्रकल्प हा कार्यक्षमतेने चालवणार का, कारण ब-याच कंपन्या ह्या डबघाईला येतात व बंद होतात.

यावेळी प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की सदरहू प्रकल्प शाश्वत प्रकल्प आहे. कंपनी सदरहू प्रकल्पात एवढी मोठी गुंतवणूक करते, तो प्रकल्प शाश्वत चालण्यासाठीच. अध्यक्षा यांनी मत मांडले की कंपनीतील अधिकारी व कर्मचारी जर कार्यक्षमतेने कार्यरत राहिले, तर कंपनी ही शाश्वत राहू शकते.

**१७) श्री उमेश पाटील, राहणार-शहापूर, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड:-**

त्यांनी उपस्थित प्रश्नांना योग्य प्रकारे उत्तरे दिली म्हणून प्रकल्पाच्या अधिका-यांचे आभार मानले. त्यांनी पुढे प्रश्न विचारला की पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करताना स्थानिक प्रशासनाची परवानगी घेतली होती का? त्यांचे काही पर्यावरणविषयक मुद्दे असतील, तर ते अहवालात घेतले का? सर्वेक्षण करताना स्थानिक लोकांची मदत घेतली का? जिल्हा आरोग्य अधिकारी यांचा अहवाल घेतला का? त्याचप्रमाणे स्थानिक लोकप्रतिनिधी यांना विश्वासात घेतले होते काय?

प्रकल्पाच्या अधिकारी यांनी सांगितले की कुठलाही प्रकल्प उभारणीसाठी एक विशिष्ट प्रकिया असते. स्थानिक जनता, लोकप्रतिनिधी यांच्यासाठी जाहिर जनसुनावणी हा महत्वाचा टप्पा असतो. जिल्हा प्रशासनाच्या साक्षीने जनसुनावणी प्रक्रिया पूर्ण करावी लागते. जनसुनावणीत स्थानिकांना प्रकल्पाविषया सूचना,आक्षेप नोंदविण्याची संधि असते. त्याप्रमाणे प्रक्रिया पार पाडत आहोत.

श्री उमेश पाटील यांनी प्रश्न विचारला की जर ग्रामपंचायतीच्या अधिका-याची सदरहू अहवालावर सही नाही, तर तो अहवाल ग्राह्य धरता येतो का?

येथे अध्यक्षा यांनी मत मांडेल की सदरहू प्रश्नकर्त्याचे म्हणणे आहे की ज्यावेळी आपण सर्वेक्षण पूर्ण केले, त्यावेळी तेथे स्थानिकांची परवानगी घेतली का? त्या पदाधिका-यांना त्याची माहिती होती का?

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की केंद्र शासनाच्या निर्देशांप्रमाणे प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघातील ११७ गावात आम्ही अभ्यास व सर्वेक्षण पार पाडले आहे. त्यावेळी उपस्थितांनी नाराजी व्यक्त करत एकत्र बोलण्यास सुरवात केली. त्यावेळी अध्यक्षा यांना मत मांडले की अहवालातील अभ्यासबाबत काही शंका वा प्रश्न असतील तर ते विचारण्यात यावेत. अभ्यास चुकला असेल, डेटा चुकला असेल तर त्याबाबत सूचना किंवा आक्षेप नोंदविण्यात यावेत.

**१८) श्री संदीप ठाकूर, राहणार पेण, तालुका पेण, जिल्हा-रायगड:**

श्री संदीप ठाकूर म्हणाले की आम्ही स्थानिक आहोत. आताच प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की ११७ गावात सर्वेक्षण करण्यात आलेले आहे. तर १० कि.मी. परिसरातील ११७ गावांची नांवे सांगण्यात यावी. त्यांनी पुढे सूचना केली की १० कि.मी परिघातील गावात आय.टी.आय, पदविका, पदवी – अभियांत्रिकी घेतलेले बरेच युवक आहेत.

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की प्रकल्पात स्थानिक युवक युवतींना प्राधान्य देण्यात येईल. त्यावेळी अध्यक्षा यांनी मत मांडले की प्रकल्पातील नोकरीसाठी विशिष्ट कौशल्य आवश्यक असल्यास त्याबाबत माहिती सांगण्याची सूचना केली. त्यावेळी अध्यक्षा यांनी सूचना केली प्रकल्प व्यवस्थापनाने असे उत्तर द्यायला हवे की प्रकल्पात नोकरी देण्यासाठी प्रशिक्षण आयोजण्यात येईल व जे कौशल्यविकास साधतील, त्यांना सेवेत घेण्यात येईल.

**१९) सौ. भाग्यश्री नंदन पाटील, ग्रामपंचायत सदस्य शहापूर, ता. अलिबाग, जि. रायगड:-**

हा जो आराखडा लावला आहे, त्यात कोणतीही दिशा दाखविलेली नाही, सर्व्हे नंबरचा उल्लेख नाही, त्यामुळे प्रकल्प हा कुठे येतो हे कळत नाही. तरी माझा मागणी आहे की शासनाने प्रत्यक्ष जागेवर जाऊन प्रकल्प स्थानाचे मोजमाप करावे, त्याचप्रमाणे जी लेखी हरकत घेतली आहे, त्याचे उत्तर देण्यात यावे.

अध्यक्षा यांनी संबधित स्त्रीस प्रकल्प आराखड्याची एक प्रत दिशा दाखवून उपलब्ध करण्याची सूचना केली.

त्यावेळी संबधित प्रकल्प अधिकाऱ्यांना प्रश्न विचारला की आपण जेव्हा सर्वेक्षण, अभ्यास केला, तेव्हा स्थानिकांची परवानगी घेण्यात आली होती का. अहवालात अपुर्ण माहिती आहे. चुकीची माहिती आहे.

प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की चेन्नई संस्था आहे, त्यांच्याकडून ईआयए सर्वेक्षण व अहवाल तयार करण्यात आलेला आहे.

त्यावेळी, अध्यक्षा यांनी सांगितले की सर्वेक्षण करताना परवानगी घेण्याची तरतुद कायद्यात नाही. ईआयए ची प्रत देणे बंधनकारक आहे.

उपस्थितांनी आक्षेप नोंदविला की कंपनी शहाबाज-शहापूरमध्ये, तर सर्वेक्षण हे चेन्नाई येथील कंपनी करते. त्यांनी ६४ गुंठे जागा घेतली तरी त्याचे परिणाम इतर ठिकाणी जास्त होतील असे मत मांडले.

त्यावेळी अध्यक्षा यांनी ६४ गुंठे जागा व त्यामुळे इतर परिणाम याबाबत स्पष्टीकरण देण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की नियोजित प्रकल्प हा लहान आहे. येथे ४-५ बार्जेस येतील. त्यामुळे या प्रकल्पाचा प्रतिकूल परिणाम परिसरात होणार नाही.

त्यावेळी सौ. भाग्यश्री पाटील यांनी परत अहवालाबाबत आक्षेप घेण्यास सुरवात केली. त्यावेळी अध्यक्षा यांनी डेटामध्ये काही त्रुटी असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. हवेची गुणवत्ता, आकडे चुकीची वाटत असेल, तर त्याबाबत आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले.

**२०) श्री. पंकज प्रकाश चवरकर, राहणार-पोयनाड, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड:-**

अहवाल हा खोटा आहे. कारण सर्वेक्षण करताना जे फोटो दाखविलेले आहेत, ते चुकीचे आहेत.

**२१) श्री मितेश पाटील, राहणार-शहापूर, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड:-**

त्यांनी सांगितले की स्थानिकांनी लेखी हरकती सादर केल्या आहेत. तरी सदरहू लेखी हरकतीस म.प्र.नि.मंडळाकडून उत्तर हे लेखी स्परुपात देण्यात यावे.

येथे सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की संबंधित प्रकल्पाविषयी ईमेलव्दारे व जनसुनावणी बैठकीत प्राप्त झालेले लेखी आक्षेपांसाठी प्रकल्प प्रवर्तकांकडून लेखी स्वरुपात उत्तर

घेण्यात येऊन ते संबंधित व्यक्तीस सादर करण्यात येईल. त्याचप्रमाणे सर्व आक्षेप व त्यास प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेली लेखी उत्तरे बैठकीच्या इतिवृत्तांतासोबत भारत सरकारला सादर करण्यात येतील.

२३) **<u>श्री मितेश पाटील, राहणार-शहापूर, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड:-</u> सांगितले की** काल मी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांना जागा दाखविली. त्यांनी जी पाहणी केली, त्याबाबत त्यांनी दोन शब्द बैठकीत सांगावेत.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की काल प्रस्तावित प्रकल्पाच्या जागेची पाहणी केली. स्थानिकांचे असे म्हणणे आहे की प्रस्तावित प्रकल्पास जाणारा रस्ता (Approach Road), तो शासनाच्या अख्त्यारित आहे, त्याचेप्रमाणे तेथे खारे पाणी येते, ते आता बंद होईल. त्याचप्रमाणे प्रकल्पाची जागा ही शासकीय जागा आहे.

२४) **श्री निलेश म्हात्रे, राहणार शहापूर यांनी** प्रश्न विचारला की आपण पाहणी करण्यास गेला होतात तर आपणाबरोबर कोण होते? आयोजक यांनी उत्तर दिले की श्री नंदन पाटील व आर. एस. पाटील होते.

२५) **त्यावेळी श्री मितेश पाटील यांनी प्रश्न विचारला की** प्रस्तावित प्रकल्पाची जागा दाखविली, ती दर्याजंग भागात आहे. तर दर्याजंग भागात प्रकल्प होऊ शकतो का? आमच्याकडे शासनाचा लेखी पुरावा आहे. त्यावेळी अध्यक्षा यांनी सांगितले की हा जेटीचा प्रकल्प असून जेटी पाण्यातच आहे.

२६) **श्री मितेश पाटील यांनी आक्षेप नोंदविताना** सांगितले की एका दिवशी ज्या दोन जनसुनावणी ठेवण्यात आली, त्यामुळे लोकांमध्ये गैरसमज आहेत.

अध्यक्ष यांनी मत मांडले की गैरसमज दूर करण्यासाठीच ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. अध्यक्षांनी प्रकल्प अधिका-यांना स्पष्टीकरण देण्याची सूचना केली.

प्रकल्पाचे अधिकारी यांनी सांगितले की २०१८ साली जेटी व साठवण (storage capacity) यासाठी अर्ज केलेला होता. तर २०२१ ला सिमेंट उत्पादनासाठी अर्ज केला होता. त्यावेळी भारत सरकारच्या पर्यावरण व वने मंत्रालयाने हे दोन्ही प्रकल्प एकत्रित असल्याने ते दोन्ही एकत्रित करा असे सांगण्यात आले.

२७) **<u>श्री आर. एस. पाटील, गाव शहापूर, ता. अलिबाग, जि. रायगड:-</u>**

ह्या दोन्ही प्रकल्पाच्या जागेची मोजणी केली का, केली असल्यास सरकारी नकाशा दाखविण्यात यावा. यावेळी प्रकल्प अधिकारी यांनी तो असल्याचे सांगितले. अध्यक्षा यांनी संबंधित व्यक्तीस हार्ड कॉपी उपलब्ध करुन देण्याची सूचना केली.

२८) **<u>श्री मंगेश भगत, गाव शहाबाज, ता. अलिबाग, जि. रायगड:-</u>**

त्यांनी विचारले की प्रकल्पात रोजगाराची संधि किती लोकांना देण्यात येईल? त्यांनी दुसरा प्रश्न महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला विचारला की एचव्हीएस लावण्याचे काही परिमाण आहे का?

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की आता जेटीची जनसुनावणी चालू आहे, त्याबद्दल माहिती सांगण्यात येईल. त्यांनी सांगितले की बांधकाम टप्प्यात ४० लोक प्रत्यक्ष आणि ४०० लोक अप्रत्यक्ष लोकांना रोजगाराची

संधि मिळेल आणि प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर दहा लोक प्रत्यक्ष आणि शंभर अप्रत्यक्ष लोकांना रोजगाराची संधि मिळेल.

उपस्थितांनी सदरहू प्रकल्प हा प्रदूषणकारी असल्याने त्यास विरोध आहे असे मत मांडले.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की मौजे शहाबाज व शहापूर, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथील अंबा नदीवरिल प्रस्तावित अदान सिमेंटेशन लिमिटेड यांचा बर्थिंग जेट्टी, अतिरिक्त साठवणूक सुविधांसह कनवेअर कॉरिडॉर व पोहोच रस्ता याची पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी म.प्र.नि. मंडळ व जिल्हाधिकारी कार्यालय,रायगड यांच्यातर्फे आयोजित करण्यात आली होती. बैठकीत स्थानिकांनी अनेक सूचना, हरकती, आक्षेप नोंदविलेले असून त्याचा बैठकीच्या इतिवृतात समावेश करण्यात येईल. त्याचप्रमाणे बैठकीत अनेक व्यक्तींनी सूचना/आक्षेप सादर केल्या असून त्यास प्रकल्प प्रवर्तकांकडून उतर मिळाल्यानंतर ते उपलब्ध करुन देण्यात येतील. लेखी सूचना, हरकती या अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व बैठकीच्या इतिवृतासोबत अध्यक्षांच्या मंजूरीने म.प्र.नि. मंडळाच्या मुख्यालयातर्फे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल विभागास सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल. सदस्य यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या वतीने जनसुनावणी ही संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

सोबत प्राप्त झालेले १९० लेखी सूचना/आक्षेप जोडलेले आहेत.

**(रा. स. कामत)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,रायगड-२,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड

**(विद्यासागर किल्लेदार)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रभारी प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड

**(डॉ. पद्मश्री बैनाडे)**
अध्यक्षा,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड,
जिल्हा-रायगड